नि.फौ.प्र. क्र. –३०३०१४७/२००२

शासन वि. सुनिल व इतर

**<u>नि.क्र. ३७८१</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ चा शपथेवर सरतपास (आरोपी क्र.३ साठी)</u>**

माझे नाव – डॉ बबन भाऊरावजी तायवाडे,

वय – ६९ वर्ष, व्यवसाय – माजी प्राचार्य.

राहणार – पावन भुमी, वर्धा रोड, नागपूर.

**<u>सरतपास – अभियोगपक्षा तर्फे विशेष सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.सी.चावरिया यांच्या मार्फत –</u>**

१. दि.१२.१२.१९९८ रोजी माझी नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदी निवड झाली होती. सदर संचालक मंडळाची पहीली सभा/बैठक सन १९९९ मध्ये झाली होती. सदर सभेमध्ये पदाधीकारी यांना देण्यात येणारे अधिकार याबाबत चर्चा व निवड झाली होती. दि.१९.०१.१९९९ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेसाठी मी हजर होतो. सदर सभेमध्ये विविध समित्यांचे गठण व त्यांचे अधिकार याबाबत निर्णय घेण्यात आले. तसेच विषय पत्रीकेवरील विषय यांच्यावर चर्चा व निर्णय घेण्यात आले. आता साक्षीदारास संचालक मंडळाच्या सभेचे मुळ रजिष्टर मधील नि.१३१८ वरील पान क्र.९४ दाखविण्यात आले. सदर पान क्र.९४ यास **निशानी क्र.१३१८/अ–३** देण्यात येते. साक्षीदार सांगतात की त्यामध्ये त्यांचे नाव आहे. आता साक्षीदारास दि.१०.१२.१९९४ ते ३०.०९.२००० पर्यंतचे संचालक मंडळ सभा व इतर सभांचे उपस्थिती रजिष्टर मधील नि.११८४ वरील पान क्र.२७२ व २७३ दाखविण्यात आले. साक्षीदार सांगतात अनु.क्र.२० वर त्यांची सही आहे. सदर पान क्र.२७२ व २७३ यास **निशानी क्र.११८४/अ–३** देण्यात येते.

सरतपास मध्यान्हाकरीता तहकुब ......

(एम.व्ही.फडे)

दिनांक – ०३.०२.२०२६ २रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,

नागपूर

सरतपास मध्यान्हानंतर शपथेवर पुढे सुरू..

२. दि.१६.०५.१९९९ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेसाठी मी हजर होतो. सदर सभेमध्ये विषय क्र.१४.६ हा सिकुरीटीज ची खरेदी विक्री कशा प्रकारे करावयाची याबाबत चर्चा व निर्णय घेण्याचा होता. सदर सभेमध्ये असे ठरले होते की, रिझर्व बँकेकडे नागपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे एस.जी.एल. खाते उघडून महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई यांच्याकडील तज्ञ समीतीचा सल्ला घेवून सरकारी प्रतिभुतींची खरेदी विक्री करण्यात यावी. त्याबाबतचा ठराव रजिष्टर मधील पान क्र.१६८ व १६९ वर आहे. त्यास **निशानी क्र.३१५८/अ–३** देण्यात येते. आता साक्षीदारास दि.१०.१२.१९९४ ते ३०.०९.२००० पर्यंतचे संचालक मंडळ सभा व इतर सभांचे उपस्थिती रजिष्टर मधील पान क्र.२८९ व २९० दाखविण्यात आले. साक्षीदार सांगतात अनु.क्र.२० वर त्यांची सही आहे. सदर पान क्र.२८९ व २९० यास **निशानी क्र.१३१९/अ–३** देण्यात येते.

३. जर बँकेस काही आकस्मीक कारणास्तव कोणता निर्णय घेण्याचा झाल्यास त्यासाठी सर्कुलेटींग ठराव पारीत केला जातो. सदर सर्कुलेटींग ठराव हा संचालक मंडळाच्या येणा–या सभेमध्ये मंजूर करून घेणे आवश्यक व गरजेचे आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी जे काही सरकारी प्रतिभुतीचे खरेदी विक्रीचे व्यवहार झाले त्यासाठी दि.१६.०५.१९९९ रोजीच्या ठरावा प्रमाणे जी कार्यवाही/पध्दत ठरविण्यात आली होती त्याचे पालन केले गेले नाही.

<u>सरतपास पुर्ण</u>

**Note** –Shri Pankaj Tamboli, the Ld. Advocate for accused No.3 is present before the Court. Accused No.3 is absent. The Ld. Advocate for accused No.3 submitted that he is not prepared for the cross-examination. The witness is a senior citizen. The matter is quite old and time bound. Hence, the cross-examination is closed in view of the proviso (c) of Section 309(2) of the Code of Criminal Procedure.

उलटतपास नाही

फेरतपास नाही.

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत

MAHESH VIJAYKUMAR PHADE

Digitally signed by MAHESH VIJAYKUMAR PHADE
Date: 2026.02.03 15:40:14 +0530

(एम.व्ही.फडे)

दिनांक – ०३.०२.२०२६

२रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,

नागपूर